महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

E-mail : ropune.dte@ gmail.com, Web : www.ropune.org.in

**- : मागासवर्गीयांचा अनुशेष व अपंगांची पदे भरण्यासाठी विशेष मोहिमेअंतर्गत रिक्त पदांची जाहिरात : -**

सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे कार्यालयाच्या अधिनस्त विविध शासकीय संस्थांतील व कार्यालयातील मागासवर्गीयांचा अनुशेष व अपंगांची पदे सरळसेवेने विशेष मोहिमेअंतर्गत भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात दिनांक .०९/११/२०११ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

भरण्यात येणा-या पदाचे नाव, वेतनश्रेणी,पदसंख्या,आरक्षण व पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव यांचा तपशील खालील प्रमाणे

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतन श्रेणी (रुपये) | रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षित पदे | समांतर आरक्षित पदे (अपंगांसह) | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| गट क (वर्ग ३) | | | | | |
| ०१ | लघुलेखक<br>वेतन ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४३०० | ०३ | अ.ज. ०१<br>भ.ज.(क) ०१<br>इ.मा.व. ०१ | क्षीण दृष्टी अथवा अस्थिव्यंग यापैकी ०१ पद (कोणत्याही प्रवर्गातील) | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.,मराठी लघुलेखनाचा वेग १०० श.प्र.मि आणि मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि.व इंग्रजी टंकलेखनाचा ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक |
| ०२ | भांडारपाल<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २८०० | ०३ | अ.जा. ०१<br>इ.मा.व. ०२ | अस्थिव्यंग अथवा कर्ण बधिर यापैकी ०१ पद (कोणत्याही प्रवर्गातील) | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अभियांत्रिकी भांडारातील भांडारपालनाचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव, तसेच मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण आवश्यक |
| ०३ | वरिष्ठ लिपीक<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०३ | अ.जा. ०१<br>इ.मा.व. ०२ | —<br>इ.मा.व.महिला ०१,<br>इ.मा.व.माजी सैनिक ०१,<br>क्षीण दृष्टी अथवा अस्थिव्यंग यापैकी ०१ पद (कोणत्याही प्रवर्गातील) | कला,वाणिज्य,शास्त्र,कायदा यापैकी कोणत्याही शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण., शासकीय कार्यालय किंवा शासकीय उपक्रम किंवा व्यावसायिक आस्थापनामधील प्रशासकीय किंवा लेखाविषयक कामाबाबतचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ०४ | कनिष्ठ लिपीक<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे १९०० | १२ | अ.जा. ०१<br>अ.ज. ०२<br>वि.जा.(अ) ०१<br>भ.ज.(ब) ०१<br>इ.मा.व. ०७ | —<br>—<br>—<br>—<br>इ.मा.व. महिला ०२,<br>इ.मा.व. माजी सैनिक ०२,<br>क्षीण दृष्टी अथवा अस्थिव्यंग अथवा मूक / कर्ण बधिर यापैकी ०२ पदे (कोणत्याही प्रवर्गातील) | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.,मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण |
| ०५ | सुतार<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०२ | अ.जा ०१<br>भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील सुतार ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| ०६ | लोहार<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०३ | अ.जा. ०१<br>अ.ज. ०१<br>भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील लोहार ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| ०७ | जोडारी<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०१ | भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील जोडारी ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| ०८ | संधाता<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०२ | अ.जा ०१<br>भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय संधाता ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| ०९ | कातारी<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०१ | भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील कातारी ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | यंत्र कारागीर<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०२ | अ.ज. ०१<br>भ.ज.(क) ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील यंत्र कारागीर ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| ११ | वीजतंत्री<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०३ | भ.ज. (क) ०१<br>इ.मा.व. ०२ | अस्थिव्यंग अथवा मूक / कर्ण बधिर यापैकी ०१ पद (कोणत्याही प्रवर्गातील) | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., सार्वजनिक बांधकाम विभागाचे पर्यवेक्षक (प्रथम श्रेणी) प्रमाणपत्र आवश्यक किंवा शासन मान्य आय.टी.आय.मधील वीजतंत्री ट्रेड उत्तीर्ण प्रमाणपत्र आवयक किंवा एन.सी.टी.व्ही.टी.वीजतंत्री प्रमाणपत्र आवश्यक. किमान एक वर्षाचा शिकविण्याचा/प्रात्यक्षिकाचा अनुभव शैक्षणिक अर्हता प्राप्त झाले नंतरचा असणे आवश्यक आहे |
| १२ | विद्युत / वीज मिस्त्री<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०१ | भ.ज.(क) ०१ | — | |
| १३ | बंधकार<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०१ | अ.ज. ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील बंधकार ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| १४ | नळ व पत्रे कारागीर<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०१ | अ.जा. ०१ | — | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., शासन मान्य आय.टी.आय मधील नळ कारागीर ट्रेड उत्तीर्ण असल्याचे सर्टिफिकेट आवश्यक |
| १५ | प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक)<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ०८ | अ.जा. ०१<br>अ.ज. ०२<br>भ.ज.(क) ०२<br>भ.ज.(ड) ०१<br>वि.मा.प्र. ०१<br>इ.मा.व. ०१ | —<br>अ.ज.महिला ०१<br>भ्.ज.(क) महिला ०१<br>—<br>—<br>— | माध्यामिक शालांत परीक्षा उत्तीर्ण., प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| १६ | वाहनचालक<br>वेतन ५२००-२०२००<br>ग्रेड पे १९०० | ०२ | भ.ज.(क) ०१<br>इ.मा.व. ०१ | — | इयत्ता ४थी उत्तीर्ण आवश्यक., जड वाहन अथवा मोटार कार चालविण्याचा परवाना असणे आवश्यक वाहन चालविण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| **गट ड (वर्ग ४)** | | | | | |
| १७ | शिपाई / ग्रंथालय शिपाई / वसतिगृह परिचर तथा शिपाई<br>वेतन ४४४०-७४४०<br>ग्रेड पे १३०० | ०५ | वि.जा.(अ) ०२<br>भ.ज.(ड) ०१<br>इ.मा.व. ०२ | वि.जा.(अ) महिला ०१<br>—<br>इ.मा.व. महिला ०१<br>क्षीण दृष्टी, अथवा अस्थिव्यंग अथवा मूक बधिर ०२ पदे (कोणत्याही प्रवर्गातील) | शासन मान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण |
| १८ | हमाल<br>वेतन ४४४०-७४४०<br>ग्रेड पे १३०० | १२ | भ.ज.(क) ०१<br>भ.ज.(ड) ०२<br>इ.मा.व. ०९ | —<br>भ्.ज.(ड ) महिला ०१<br>इ.मा.व.महिला ०२,<br>इ.मा.व.माजी सैनिक ०१,<br>क्षीण दृष्टी ०१ अस्थिव्यंग ०२ मूक बधिर ०१ पद | लिहिता- वाचता येणे आवश्यक |
| १९ | यंत्र परिचर<br>वेतन ४४४०-७४४०<br>ग्रेड पे १३०० | ०१ | अ.ज. ०१ | — | लिहिता- वाचता येणे आवश्यक |

विशेष टीप : 1) जनहित याचीका क्रमांक 3294/2010 व इतर यावर मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वरील पदांची अंतिम निवड यादी तयार करताना अपंगांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल 2) वर नमूद केलेल्या पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांनी राखून ठेवले आहेत. तसेच जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती रद्द करण्याचे अधिकार सहसंचालकांनी राखून ठेवले आहेत. अपंगाचे आरक्षण व मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील. अपंग आरक्षणामधील पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास त्याच आरक्षणातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल

## उपनिर्दिष्ट सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी खालील प्रमाणे असतील

अतिरीक्त आवश्यक अर्हता : वरील अ.क्र. १ ते १६ या पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे पुढे नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षांच्या आंत सादर करणे आवश्यक राहील., अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत **MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.**

**वयोमर्यादा : उमेदवाराचे वय दि. १९/१०/२०११ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे (मागासवर्गीयांकरिता ३८ वर्षे व अपंगासाठी ४५ वर्षे)**

शासकीय कार्यालयातील मागासवर्गीय व अपंग कर्मचाऱ्यांच्या बाबतीत उच्चतम वयोमर्यादा लागू असणार नाही.

**सर्वसाधारण सूचना व अटी :**

०१ उमेदवारांनी अर्जाचे लखोट्यावर ठळक अक्षरात " ------------------------------ या पदासाठी अर्ज " असे लिहावे.तसेच अर्जासोबत स्वत:चा ठळक अक्क्षरात पत्ता लिहिलेले व रु.५/- चे पोस्टाचे तिकीट लावलेले ५ X११ सें.मि.आकाराचे रिकाम पाकीट जोडावे.

०२. सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज करावा. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे व शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच एखाद्या उमेदवाराने यापूर्वी या कार्यालयाकडे केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

०३. शासकीय / निमशासकीय सेवेतील अपंग व मागासवर्गीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विहीत मुदतीत पाठवावेत.

०४. अर्जा सोबत शैक्षणिक अहर्ता / अनुभव / जन्म दिनांक इत्यादी तसेच सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र आणि उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र व अपंगत्वाचे प्रमाणपत्र इत्यादींच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात. मुलाखतीच्या वेळी सर्व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

०५ उमेदवारास मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक आहे.

०६. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्राची (डोमिसाईल) साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

०७. वि.जा., भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलअर) दि.३१.०३.२०१२ पर्यंतचे वैध असलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

०८. महिला साठी असलेल्या आरक्षणासाठी नॉन क्रिमीलअरचे तहसिलदार/नायब तहसिलदार यांचे प्रमाणपत्र सादर करावे.अनुसुचित जाती व जमाती या प्रवर्गातील महिला वगळून इतर सर्व प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्त व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहिल.सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांचा महिला आरक्षीत या पदावर निवड करण्यात येणर नाही.

०९ . रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केली असल्यास अद्यायावत नोंद पत्राची छायांकित प्रत जोडावी.

१०. अपंग व मागासवर्गीय उमेदवारांना लेखी परीक्षेला तसेच मुलाखतीला बोलाविलेल्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.त्यांची निवड झाल्यास या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सातारा,सांगली,कोल्हापूर,सोलापूर व पुणे या जिल्हयातील कोणत्याही शासकीय कार्यालय/संस्थेमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा या विभागातील कोणत्याही कार्यालय/संस्थेमध्ये बदलीस पात्र असेल.

११. जाहिराती मध्ये नमूद केल्या प्रमाणे पात्रताधारक असल्याची खात्री करुनच उमेदवाराने अर्ज करावे.

१२. केवळ अपंगासाठी उमेदवाराची निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता गुणानुक्रमे त्यांची निवड करण्यात येईल.

१३. ज्या अपंग उमेदवारांस लेखनिक नियमानुसार अनुज्ञेय आहे अशा उमेदवाराने लेखनिकाची व्यवस्था स्वत: करावी व लेखनीक संबंधित पदाच्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक इयत्ता कमी शिकलेला असावा.

१४. अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियमकालिक, अर्धवेळ, निद्यावेतन, अभ्यागत, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी,अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे केल्याचे पुरावे अर्जा सोबत जोडावेत.

१५. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे वेतन व भत्ते लागू राहतील.

१६. शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१ ऑक्टोबर २००५ मधील तरतुदींनुसार नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल.

१७. ओळखपत्र आकाराचे अलिकडील काळाचे स्वत:चे छायाचित्र उमेदवाराने अर्जावर विहीत ठिकाणी चिकटवून त्यावर उमेदवाराने स्वत:च्या स्वाक्षरीने साक्षांकन (अटेस्टेशन) करावे. तसेच सोबत जोडलेल्या ओळखपत्राच्या नमुन्यामध्ये सुध्दा विहीत ठिकाणी स्वत:चे ओळखपत्राच्या आकाराचे अलिकडील काळाचे छायाचित्र चिकटवून ओळखपत्र नमुना अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८. **अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक** : विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज सहसंचालक, तंत्रशिक्षण **विभागीय कार्यालय, ४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे १६** या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत **दि. १९/१०/२०११ पासून दि. ९/११/२०११ पर्यंत हस्त देय शासकीय सुटटया वगळून अथवा डाकव्दारे** पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. **दि.९/११/२०११** नंतर टपालाच्या दिरंगाईने प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

१९. **लेखी परीक्षा /चाचणी / मुलाखत शुल्क :- १) अ.क्र. २,३,४ या पदांसाठी : खुला वर्ग रु.१५०/- व राखीव प्रवर्ग रु.७५/-**
२) अन्य पदांसाठी : खुला वर्ग २००/- व राखीव प्रवर्ग रु.१००/-
माजी सैनिक उमेदवाराना शुल्क भरण्याची अट लागू नाही

**अर्जा सोबत** सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे (The Joint Director ,Technical Education,Regional Office,Pune) यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे येथे देय असलेला रेखांकित धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडावा. उमेदवाराने धनाकर्षाच्या मागे त्याचे नाव व पत्ता इंग्रजी भाषेमध्ये ठळक अक्षरात आणि पदाचे नांव लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. रोख रक्कम, धनादेश, मनीऑर्डर, पोस्टल ऑर्डर, पोस्टाची तिकिटे, कोर्ट फी स्टॅम्प इ.स्वरुपात शुल्क स्विकारला जाणार नाही. माजी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. **उमेदवारांनी पाठविलेली शुल्काची रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.**

२०. (अ) अ.क्र.१ ते १९ मधील सर्व पदांकरिता लेखी परीक्षा अनिवार्य आहे.
(ब) १) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
२) कनिष्ठ लिपीक, भांडारपाल , विजतंत्री सुतार, बंधकार, संधाता, प्रयोगशाळा सहाय्यक,लघुलेख या पदांसाठी लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान,अंकगणित या विषयांवरील परीक्षा घेण्यात येईल.
३) वरिष्ठ लिपीक पदासाठी लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक या विषयांवरील परिक्षा घेण्यात येईल.जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ % व त्यापेक्षा जास्त गुण मिळवितील असेच उमेदवार व्यावसायिक चांचणी व मुलाखतीसाठी पात्र असतील.
४) लेखी परीक्षा व व्यावसायिक चांचणी परीक्षेतील एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार व पदांच्या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.
५) शिपाई/ग्रंथलाय शिपाई/वसतिगृह परिचर तथा शिपाई, हमाल, यंत्रपरिचर या पदासाठी इयत्त ४थी पर्यन्तच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा राहिल.

भांडारपाल, वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लपीक या पदांसाठी फक्त लेखी परीक्षा घेतली जाईल. उर्वरित पदांसाठी लेखी परीक्षा, व्यवसायिक चाचणी व मुलाखत घेतली जाईल. लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीकरिता पात्रता ठरवून रिक्त पदाच्या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.लेखी परीक्षा, चाचणी व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.मुलाखतीस गैरहजर राहिल्यास उमेदवार अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल.

२१. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविले जाईल.

२२. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्यास / अपुरी कागदपत्रे असल्यास किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यांस त्या उमेदवाराची उमेदवारी अथवा नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२३. सदर जाहिरात व अर्जाचा नमुना www.ropune.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच अर्जाचा नमुना A4 पेपर साईज मध्ये जाहिराती सोबत दिलेल्या नमुन्यातच हस्तलिखीत, संगणकीकृत अथवा टंकलिखीत करुन नमूद केलेल्या पत्यावर अर्ज करावा.

२४. अपंग प्रवर्गातील उमेदवारांनी अंध-लो व्हिजन /कर्णबधिर /मुकबधिर/अस्थिव्यंग /एका हाताने किंवा एका पायाने अपंग (त्यांचे ४० टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र) असल्याचे सबंधित जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय मंडळाने (सक्षम प्राधिकरण) यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२५. निवड झालेल्या अपंग उमेदवारास संबंधित वैद्यकीय मंडळाने त्या पदासाठी कार्यक्षम ठरविल्यानंतर नेमणूकीचे आदेश देण्यात येतील.

२६. वरील सूचनांनुसार परिपूर्ण नसलेले व शैक्षणिक प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज रद्रद समजण्यात येतील.

२७. भरती प्रक्रिये संदर्भात उदभवणारे वाद/तक्रारी इत्यादी बाबत सहसंचालक,तंत्रशिक्षण,पुणे यांचा निर्णय अंतिम राहिल.

२८. जाहिरातीमधील कोणत्याही पदासाठी अर्ज करणा-या विवाहित उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) **नियम २००५ अन्वये नमुना अ मधील सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

सही/
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे १६

# विशेष मोहिमे अंतर्गत अपंग व मागासवर्ग अनुशेष भरती अर्जाचा नमुना

" " या पदासाठी अर्ज

( कार्यालयीन वापराकरिता )
अर्ज नोंदणी क्रमांक
व दिनांक

| | |
|---|---|
| | |

| पात्र | | तपासणा-या अधिका-यांची स्वाक्षरी व नांव | |
|---|---|---|---|
| अपात्र | अपात्र असल्यास कारणे | प्रथम अधिकारी | द्वितीय अधिकारी |
| | | | |

उमेदवाराने ओळखपत्राच्या आकाराचे अलिकडच्या काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे (स्टेपल करु नये) व ते स्वत: साक्षांकित करावे

प्रति,

मा. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे - ४११ ०१६.

१. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** -----------------------------------------------------------
(आडनांव) (स्वत:चे नांव) (वडिलांचे / पतीचे नांव)

२. **जन्मतारीख :** ------------------व दि. रोजी वय ----- वर्षे ------ महिने
(एस.एस.सी. प्रमाणपत्र / वयाचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील नोंदीप्रमाणे)

३. **लिंग :** पुरुष / स्त्री ( लागू नसेल ते खोडावे)

४. विवाहीत / अविवाहीत ( नको ते खोडावे)

५. **पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता** (पिनकोड क्रमांकासह)
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

६. सामाजिक आरक्षण (योग्य त्या ठिकाणी ✓ अशी खूण करावी)

| अ.जा. | अ.ज. | विजा-अ | भ.ज -ब | भ.ज -क | भ.ज -ड | वि.मा.प्र | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

जात ----------------------- पोटजात ---------------------------

७. समांतर आरक्षण (योग्य त्या ठिकाणी ✓ अशी खूण करावी)।

| महिला | अपंग | खेळाडू | माजी सैनिक | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|

८. स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांचे पाल्य / जनगणना कर्मचारी / अंशकालीन कर्मचारी/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/हजेरीसहाय्यक/ माजी सैनिक/खेळाडू ( अनावश्यक खोडावे)

०९. अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार व प्रमाण (          %) (योग्य त्या ठिकाणी ✓ अशी खूण करावी)

| एक पाय (One leg) | एक हात (One hand) | दोन्ही पाय (Both leg) | एक हात व एक पाय (One hand & One leg) | अंध (Blind) | अल्प दृष्टी (Low vision) | कर्णबधीर Hearing andicapped) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

१०. आपण परीक्षेत लेखणीकाची मदत घेणार आहात का ?   होय / नाही (अपंग उमेदवारांच्या बाबतीत)

११. रेखांकित धनाकर्ष क्रमांक ------------ दिनांक ------------- व रक्कम --------
बँकेचे नांव व शाखा ---------------------------------------------------

१३. **शैक्षणिक अर्हता :**

| परीक्षा | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष - महिना | शाळा / विभागीय मंडळ / विद्यापीठ / संस्था | प्राप्त गुणांची टक्केवारी | श्रेणी | छायांकित प्रत जोडली आहे / नाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१४. **अनुभव :**

| पदनाम | वेतन श्रेणी (रुपये) | कार्यालय / संस्था / आस्थापनेचे नांव | पासून | पर्यंत | एकूण कालावधी | कामाचे संक्षिप्त स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

मी, श्री / श्रीमती -------------------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, माझ्या माहिती व ज्ञानानुसार वरील तपशील सत्य आणि अचूक आहे., आणि नंतर कोणताही तपशील खोटा आढळल्यास माझी उमेदवारी / नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणा-या कारवाईस माझी काहीही हरकत असणार नाही. अर्ज उशीरा प्राप्त झाल्यास, अर्ज परिपूर्ण नसल्यास अथवा पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्यास अर्ज रद्द ठरविला जाईल व त्याबाबत मला काहीही कळविले जाणार नाही, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** **उमेदवाराची स्वाक्षरी**

## प्रतिज्ञापनाचा नमुना :

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना अ**

**प्रतिज्ञापन (विवाहीत उमेदवारांसाठी )**

**( नियम ४ पहा)**

मी श्री / श्रीमती / कुमारी --------------------------- श्री ------------------------ यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ------, राहणार --------------------------------------------------------------------------------------------- या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

०१) मी ---------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

०२) आज रोजी मला ------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्या पैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

०३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व या नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी :

नाव :

---

## ओळखपत्राचा नमुना

| नोंदणी क्रमांक | |
|---|---|

०१ उमेदवाराचे संपूर्ण नांव व पत्ता ---------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

उमेदवाराने ओळखपत्राच्या आकाराचे स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे (स्टेपल करु नये) व ते स्वत: सांक्षंकित करावे

०२ अर्ज केलेल्या पदाचे नांव ---------------------------------------